Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3 (B)| March - 2026

Original Article

# मध्ययुगीन काळात इंग्रज, डच व मोगल सत्ताधीशांना कर्ज पुरवठा करणारे सावकार

**डॉ. घोलप के. जी.**
(इतिहास विभाग प्रमुख), शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण, ता.कळंब जि. धाराशिव

**Manuscript ID:**
JRD -2026-180335
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(B)
Pp. 141-144
March - 2026
**Submitted:** 03 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 28 Mar. 2026
**Published:** 31 Mar 2026

***सारांश:***

*प्रस्तुत संशोधन निबंधामध्ये मध्ययुगीन काळातील भारतातील प्रमुख सावकार आणि व्यापारी घराण्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. विशेषतः विरजी व्होरा, शांतीदास झवेरी आणि जगतशेठ माणिकचंद यांच्या आर्थिक सामर्थ्याचा तसेच ब्रिटिश, डच आणि मोगल सत्ताधीशांना त्यांनी केलेल्या कर्जपुरवठ्याचा आढावा घेण्यात आला आहे. विरजी व्होरा यांनी सुरतमधील व्यापार, बँकिंग आणि सावकारी क्षेत्रात मोठे वर्चस्व प्रस्थापित केले होते. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि डच ईस्ट इंडिया कंपनी यांच्यासह अनेक व्यापारी व सत्ताधीश त्यांच्या आर्थिक सहाय्यावर अवलंबून होते. शांतीदास झवेरी यांनी दागिने व आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून आर्थिक प्रभाव निर्माण केला, तर जगतशेठ घराण्याने बंगालच्या आर्थिक व्यवस्थेमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या सावकारांनी केवळ व्यापारच नव्हे तर तत्कालीन राजकीय आणि आर्थिक व्यवस्थेवरही प्रभाव टाकला होता. त्यामुळे मध्ययुगीन भारताच्या आर्थिक इतिहासात या व्यापारी-सावकारांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे स्पष्ट होते.*

***मुख्य शब्द:*** *मध्ययुगीन भारत, विरजी व्होरा, शांतीदास झवेरी, जगतशेठ माणिकचंद, ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी, डच ईस्ट इंडिया कंपनी, मोगल साम्राज्य, सावकार, व्यापार, कर्जपुरवठा, सुरत, आर्थिक इतिहास, बँकिंग व्यवस्था.*

## प्रस्तावना:-

भारत अनेक दशकांपासून जगभरातील काही श्रीमंत लोकांचे घर आहे ज्यांनी उद्योगपती, तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे आणि अशा कंपन्या उभारल्या आहेत ज्यांनी देशाच्या संपत्तीत योगदान देऊन नशीब कमावले आहे. असेच एक उद्योगपती विरजी व्होरा होते, जे मुघल काळात सुरतचे रहिवासी होते.त्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीबद्दल फार कमी माहिती असली तरी, विद्वान आणि इतिहासकारांनी असे नोंदवले आहे की ते श्रीमाली ओसवाल पोरवाल जातीचे होते. मंदिर बांधणे किंवा मोठ्या प्रमाणात तीर्थयात्रा आयोजित करणे यासारख्या महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सामान्य नेत्याला संघपती/संघवी ही पदवी दिली जाते, ती धार्मिक विषयांमध्ये त्यांच्या महत्त्वपूर्ण सहभागामुळे त्यांना देण्यात आली. ते १६१९-१६७० च्या दशकात सक्रिय होते आणि त्या काळात व्यापारात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

## संशोधनाची उद्दिष्टे:-

१) वीरजी व्होरा यांच्या संपत्ती विषयी आढावा घेणे.
२) सुरतेच्या सुभेदाराबरोबर झालेल्या संघर्षाचा आढावा घेणे.
३) व्होरा फर्म च्या शाखांचा आडवा घेणे.

**Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)**
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*घोलप के. जी. , (इतिहास विभाग प्रमुख), शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण, ता.कळंब जि. धाराशिव*

***How to cite this article:***
*घोलप, . के. जी. (2026). मध्ययुगीन काळात इंग्रज, डच व मोगल सत्ताधीशांना कर्ज पुरवठा करणारे सावकार. Journal of research and development, 18(3(B)), 141–144.*
https://doi.org/10.5281/zenodo.21158271

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21158271

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3 (B)| March - 2026

१) ब्रिटिश व डच यांना करत असलेल्या कर्ज पुरवठ्यासंबंधी आढावा घेणे.

२) शांतीदास झवेरी व माणिकदास यांचा कर्ज पुरवठा विषयी आढावा घेणे.

**संशोधनाची गृहीतके:-**

१) मध्ययुगीन काळात विरजी व्होरा हा धनाढ्य सावकार असल्याचे दिसून येते.

२) मध्ययुगीन काळात विरजी व्होरा सर्वांचे संबंध सलोख्याचे ठेवत होता असे दिसून येते.

३) इंग्रज, डच यांना सुद्धा वीरजी व्होरा बाबतीत दरारा निर्माण झाला होता.असे दिसते

४) शांतिदास झवेरी याने परकीय व्यापारात धबधबा निर्माण केला होता असे दिसते.

५) ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी ने भारतीय सावकाराशी चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. त्यामध्ये विविध राजकीय संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, इंटरनेट व वर्णनात्मक इत्यादी दुय्यम साधनाचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**१) वीरजी व्होरा यांची संपत्ती:-**

"17व्या आणि 18व्या शतकातील व्यापारी-सावकार जसं की सुरतचे वीरजी व्होरा, अहमदाबादचे शांतीदास आणि बंगालचे जगतशेठ घराणे यांनी इतकी संपत्ती जमा केली होती की, त्यांनी त्यावेळच्या इटलीच्या समुद्रकिनारी असलेल्या व्हेनिस शहरातील आणि भूमध्य समुद्रावरील जिनिव्हा शहरातील सावकारांना मागं टाकलं होतं."[1] हे सावकार ज्यांच्या अधीन होते, अशा राजे आणि नवाबांपेक्षाही ते जास्त श्रीमंत झाले होते, मराठ्यांच्या लुटीनंतरही व्होरांची वैयक्तिक संपत्ती त्यावेळी सुमारे 80 लाख रुपये होती. त्यांना पुन्हा उभं राहण्यास वेळ लागला नाही.व्होरा हे घाऊक व्यापार, पैशांचे व्यवहार आणि बँकिंग क्षेत्रात कार्यरत होते. सुरतमधील काही आयातीवर त्यांची मक्तेदारी होती. त्याचबरोबर मसाले, सोने-चांदी, पोवळे, हस्तिदंत, शिसे आणि अफूचा ते व्यापार करत असत.मुघल काळात व्होरा यांचे सुरतच्या सुभेदाराशी चांगले संबंध होते.

**२) सुरतेच्या सुभेदाराबरोबर झालेला संघर्ष:-**

सुरतचा सुभेदार मुअज-उल-मुल्क मीर मुसा हा इंग्रजांशी व्यापार करायचा.मीर मुसाशी चांगले संबंध ठेवण्यासाठी, व्होरा यांनी मीर मुसा व्यापार करत असलेल्या वस्तूंचा इंग्रजांशी व्यवहार केला नाही. नंतर, 1642 मध्ये मीर मुसानं व्होरा यांना मोठ्या प्रमाणात प्रवाळ खरेदी करण्यास मदत केली.1643 मध्ये व्होरा मीर मुसा याच्याशी असलेल्या संबंधांचा फायदा घेत त्यांनी प्रवाळ, मिरपूड आणि इतर वस्तूंवर मक्तेदारी प्रस्थापित केली. "एकदा मीर मुसाच्या अनुपस्थितीत, सुरतच्या सुभेदारानं सर्व मिरची जप्त केली, व्यापाऱ्यांकडून पैसे उकळले. ज्यामुळं व्होरांबरोबर त्याचा वाद झाला.1638 मध्ये व्होरांवर 50 आरोपांखाली तुरुंगात टाकण्यात आलं. व्होरांनी शाहजहाँच्या दरबारात त्यांच्यावरील सर्व आरोप फेटाळले. बादशाहने त्यांना मुक्त केलं आणि सुभेदाराला बडतर्फ केलं."व्होरा यांनी शाहजहाँला चार अरबी घोडे दिल्याचा उल्लेख इतिहासात आहे."[2]

**३) व्होरा फर्म च्या शाखां:-**

"व्होरा फर्मच्या भारतातील विविध शहरांमध्ये तसेच पर्शियन गल्फ, लाल समुद्र आणि आग्नेय आशियातील बंदरामध्ये शाखा होत्या.सुरतमधील व्यापारासाठी मुघलांच्या दरबारात पोहोचलेले ईस्ट इंडिया कंपनीचे प्रतिनिधी.मेहता यांच्या मते, व्होरा हे अनेकदा खास लवंगांची संपूर्ण खेप खरेदी करत. नंतर ते इतर भारतीय आणि परदेशी व्यापाऱ्यांना स्वतःच्या अटी-शर्तीवर विकायचे. व्होरा यांच्या नेतृत्वाखालील व्यापाऱ्यांचा गट 50 हजार ते 10 लाख रुपयांपर्यंत संपूर्ण माल खरेदी करत असत."[3] "युरोपियन वस्तूंचे एकमेव मक्तेदार' असं केलं आहे. व्होरा यांनी युरोपियन व्यापारी आणि स्थानिक छोटे व्यापारी यांच्यातील व्यवहार मर्यादित केले. त्यांच्या इच्छेनुसार 'वेळ आणि किंमत' निश्चित केली"[4].

**४) ब्रिटिश व डच यांना करत असलेला कर्ज पुरवठा:-**

"ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि डच ईस्ट इंडिया कंपनीनं वीरजी व्होरा यांच्याकडून कर्ज घेतलं होतं. व्होरा यांनी कधीही ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीशी स्पर्धा केली नाही. पण, ते सुरतमधील त्यांचे सर्वात मोठे कर्जदार आणि ग्राहकही होते.दोघांमध्ये अनेकवेळा भेटवस्तूंची देवाणघेवाण आणि पत्रव्यवहार होत असे. व्होरा घेत असलेल्या उच्च व्याजदरांबद्दल ब्रिटिशांनी अनेकदा तक्रारी केल्या होत्या. व्होरा त्यांच्याकडून मासिक 1 ते 1.5 टक्के दरम्यान व्याज घ्यायचे."[5] "सुरत शहरात पैशाची मोठी टंचाई आहे. वीरजी व्होरा हे एकमेव मालक

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3 (B)| March - 2026

आहेत. व्होरा यांच्याशिवाय कोणीही कर्ज देऊ शकत नाहीत."[6] "भारतातील डच ईस्ट इंडिया कंपनीला वीरजी व्होरा आणि त्यांचे जवळचे सहकारी शांतीदास झवेरी यांच्याकडून मोठ्या प्रमाणात भांडवल मिळाले होते"[7].

व्होरा यांनी अनेक इंग्रजी व्यापाऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक व्यवसायासाठीही पैसे दिले होते. ज्यावर कंपनीच्या लंडन कार्यालयानं सक्त शब्दांत असहमती दर्शवली होती. Hulton Archive1850 मध्ये, येमेनमधील मोचा बंदरावरील कॉफी. "वीरजी व्होरांनी ब्रिटिश आणि गुजरातींना या कॉफीची ओळख करुन दिली."[8] डच आणि ब्रिटिश दोघेही व्होरा सेवा आणि हुंडी किंवा डिमांड ड्राफ्ट, ट्रॅव्हलर्स चेक यांसारख्या कागदपत्रांचा वापर सुरतहून आग्राला मोठ्या प्रमाणात पैसे पाठवण्यासाठी करत.

डच व्यापारी अहवालानुसार, व्होरांची सुरत व्यापार आणि बाजारपेठेवरील आर्थिक पकड युरोपियन व्यापाऱ्यांसाठी कायमचा अडथळा निर्माण करणारी ठरली होती. "1670 पर्यंत व्होरा याचं वय वाढलं होतं. त्याच वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतेवर केलेल्या दुसऱ्या आक्रमणामुळं त्यांचं आणखी मोठं नुकसान झालं."[9] इंग्रज आणि डचांच्या अभिलेखांमध्ये 1670 नंतरच्या सुरतच्या व्यापारी आणि दलालांमध्ये त्यांचा उल्लेख आढळत नाही. जर व्होरा 1670 नंतर जिवंत असते तर त्यांचा उल्लेख इंग्रजी कागदपत्रांमध्ये केला गेला असता. त्यामुळं व्होरा यांचा 1670 मध्ये मृत्यू झाला असावा असा त्याचा अंदाज आहे.परंतु, व्होरा यांनी व्यवसायातून निवृत्ती घेऊन त्यांचा नातू नानचंद याच्याकडे व्यवसाय सोपवला असावा, त्यांच्यानुसार 1675 मध्ये व्होरांचा मृत्यू झाला असावा.

**५) शांतीदास झवेरी व माणिकदास यांचा कर्ज पुरवठा:-**

शांतीदास दागिने आणि इतर व्यवसायात नावारूपाला आले होते. ते मुघल राजघराणं, उच्चभ्रू वर्गासह श्रीमंतांना दागिने, आभूषणं विकत. "शांतीदास याना मुघल दरबार आणि राजघराण्यात शाही झवेरी म्हणून विशेष प्रवेश होता."[10] शांतीदास यांना राजघराण्याला दागिने देण्यासाठी निवडलं गेले असल्याचं सम्राट जहाँगीर आणि दारा शिकोह यांनी यांच्या आदेशात म्हटलं होतं. "विल्यम फॉस्टरने इंग्रजी फॅक्टरी रेकॉर्ड्समध्ये लिहिलं आहे की, शांतीदास ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी, डच, पर्शियन आणि अरब व्यापाऱ्यांशीही व्यापार करत असत. त्यांच्या व्यापारातील वस्तूंमध्ये लवंग आणि इतर विविध वस्तूंचा समावेश होता"[11]. सप्टेंबर 1635 मध्ये शांतीलाल आणि इतर काही व्यापाऱ्यांच्या मालावर ब्रिटिश चाच्यांनी हल्ला करून त्यांना लुटलं.पण शांतीदास यांनी आपले राजकीय संबंध आणि प्रभावाचा वापर करुन इंग्रजांकडून आपलं नुकसान भरून घेतलं.

**माणिकचंद (जगतशेठ)**

"जगतशेठ हे श्रीमंत व्यापारी, बँकर आणि सावकार कुटुंब होतं. ते बंगालच्या नवाबांच्या काळात प्रमुख होते. त्यांचा प्रभाव युरोपमधील रॉथस्चाइल्ड कुटुंबाइतका मोठा नव्हता.परंतु 17व्या आणि 18 व्या शतकातील मुघल साम्राज्याच्या अर्थव्यवस्थेवर त्यांच्या प्रभावाची तुलना युरोपीय आर्थिक व्यवस्थेतील रोथस्चाइल्ड कुटुंबाच्या भूमिकेशी केली जाऊ शकते. "माणिकचंदच्या घराण्याचे संस्थापक हिरानंद शाह, जे राजस्थानच्या नागौरचे रहिवासी होते. 1652 मध्ये ते पाटण्याला आले.1707 मध्ये, त्यांचा मुलगा माणिकचंद यांनी मुघल राजपुत्र फारुखशाहला आर्थिक मदत केली. ज्याच्या बदल्यात त्यांना जगतशेठ, म्हणजे 'वर्ल्ड बँकर' ही पदवी मिळाली."[12] माणिकचंद यांनी बंगालचा पहिला सुभेदार मुर्शिद कुली खानला ढाका सोडून हुगळी नदीच्या किनाऱ्यावर मुर्शिदाबादला स्थायिक होण्याचा सल्ला दिला.

जगतशेठ कुटुंबाची संपत्ती आणि प्रभाव असा होता की, त्यांच्याशिवाय मुघल साम्राज्याचे आर्थिक धोरण प्रगती करू शकले नसते आणि बंगालची अर्थव्यवस्थाही चालू शकली नसती. "जगतशेठ यांची आर्थिक भूमिका बँक ऑफ इंग्लंडसारखीच होती.या कुटुंबानं बंगाल सरकारला विविध आर्थिक सेवा पुरवल्या. यात महसूल किंवा करवसुली, हुंडी आणि कर्जांचा समावेश होता.बंगालमधील नाणे तयार करण्यावर त्यांची पूर्ण मक्तेदारी होती. त्याचबरोबर मुघल खजिन्यासाठी वार्षिक महसूल गोळा करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती."[13] पत्रकार सहाय सिंग यांनी एका लेखात लिहिलं आहे की, नवाबांपासून ते फ्रेंच, पोर्तुगीज, डच आणि ब्रिटिश कंपन्यापर्यंत सर्व त्यांचे कर्जदार होते.1714 मध्ये माणिकचंद यांचं निधन झालं. तोपर्यंत त्यांनी भारतातील सर्व प्रमुख शहरांमध्ये आपल्या व्यावसायिक कंपनीच्या शाखा सुरू केल्या होत्या. त्यांचा व्यवसाय मुघल सम्राट, बंगालचा नवाब आणि ईस्ट इंडिया कंपनी तसेच फ्रेंच आणि पोर्तुगीज व्यापाऱ्यांशी होता. त्यामुळं या व्यापारी कुटुंबाची संपत्ती, सत्ता आणि प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढला.

**निष्कर्ष:-**

१) विरजी व्होरा याने संपत्तीच्या बाबतीत जागतिक स्तरावर नाव कमावलेले दिसून येते.

२) विरजी व्होरा याने मसाल्याच्या व्यापारात वर्चस्व निर्माण केल्याचे दिसून येते.

३) मोगल सत्ताधीशांसोबत चांगले संबंध रहावे यासाठी विरजी व्होरा या सावकाराने अनेक भेटवस्तू मोगल सत्ताधीशांना दिल्याचे दिसून येते.

४) शांतीदास झवेरी याने मौल्यवान वस्तूच्या क्षेत्रात धबधबा निर्माण केला होता.

५) माणिकचंद या सावकाराची तुलना युरोपातील नामांकित व्यापारी कुटुंब रॉथ्स चाइल्ड यांच्याशी केली जाऊ शकते.

६) मध्ययुगीन काळात सर्व सत्ताधीश वरील सावकाराकडून सतत कर्ज घेतल्याचे दिसून येते.

**समारोप:-**

अशा प्रकारे वरील मुद्द्याच्या आधारे आपण मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचा अभ्यास केला असता त्या काळात तात्कालीन परिस्थितीला अनुसरून विविध सत्ताधीशांना म्हणजेच ब्रिटिश डच व मोगल सत्ताधीशांना हेच सावकार कर्जपुरवठा करत होते. त्याचबरोबर वीरजी व्होरा, शांतीदास, व माणिकचंद सारखे सावकार व्यापारातही मागे नव्हते वरील सर्वांनी भारत आणि भारताबाहेर तात्कालीन प्रतिकूल परिस्थितीत व्यापारात आपला दाब्तबा निर्माण केला होता. सर्व सत्ताधीशा बरोबर व्यवस्थित संबंध प्रस्थापित करून आपला व्यवसाय वाढवण्याचा प्रयत्न वरील सर्व सावकारांनी केला.

**संदर्भ ग्रंथ:-**

1. 'क्राऊचिंग ड्रॅगन, हिडन टायगर', प्रेमशंकर झा, प्रकाशन:सोफ्ट स्कुल पी. आर. 1 डिसेंबर 2009, पा. नं. 203.
2. 'इंडियन मर्चंट्स अँड एंटरप्रिन्युअर्स इन हिस्टोरिकल पर्स्पेक्टिव्ह', मकरंद मेहता, अकॅडमीक फाउंडेशन, दिल्ली -1991, पा. न. 135.
3. 'मर्चंट प्रिन्स वीरजी व्होरा', बाळकृष्ण गोविंद गोखले, लोकप्रिय प्रकाशन-1979, पा. न. 137-146.
4. इंग्रजी फॅक्टरी रेकॉर्डमध्ये व्होरा यांचं वर्णन 18 जुलै 1643.
5. 'इंडियन मर्चंट्स अँड एंटरप्रिन्युअर्स इन हिस्टोरिकल पर्स्पेक्टिव्ह', मकरंद मेहता, अकॅडमीक फाउंडेशन, दिल्ली -1991, पा. न. 230.
6. 'मर्चंट प्रिन्स वीरजी व्होरा', बाळकृष्ण गोविंद गोखले, लोकप्रिय प्रकाशन-1979, पा. न.243.
7. 'द अरेबियन सीज: द इंडियन ओशन वर्ल्ड ऑफ द सेव्हेंथ सेंचुरी', आर.जे. ब्रँड्सन, प्रकाशन-Routledge; 1st edition (31 May 2001), पा. न.430.
8. 'मर्चंट प्रिन्स वीरजी व्होरा', बाळकृष्ण गोविंद गोखले, लोकप्रिय प्रकाशन-1979, पा. न.244
9. 'इंडियन मर्चंट्स अँड एंटरप्रिन्युअर्स इन हिस्टोरिकल पर्स्पेक्टिव्ह', मकरंद मेहता, अकॅडमीक फाउंडेशन, दिल्ली -1991, पा. न. 140.
10. 'मर्चंट प्रिन्स वीरजी व्होरा', बाळकृष्ण गोविंद गोखले, लोकप्रिय प्रकाशन-1979, पा. न.254
11. 'इंडियन मर्चंट्स अँड एंटरप्रिन्युअर्स इन हिस्टोरिकल पर्स्पेक्टिव्ह', मकरंद मेहता, अकॅडमीक फाउंडेशन, दिल्ली -1991, पा. न. 219.
12. 'द अनार्की', विल्यम डॅलरिम्पल, ब्लूम्सबरी प्रकाशन, 2019 पा. न.360
13. 'प्लासी: द बॅटल दॅट चेंज द कोर्स ऑफ इंडियन हिस्ट्री', सुदीप चक्रवर्ती, Rupa Publications India, 2020, पा. न.360.